ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– I Jan-Feb 2021

# औरंगाबाद जिल्हयातील स्त्री–पुरूष प्रमाण (Sex - Ratio ) :– एक भौगोलिक अभ्यास

**डॉ. राजेंद्र भिमराव भालेराव.**

*भूगोल विभाग प्रमुख, श्री आसारामजी भांडवलदार कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय, देवगांव रंगारी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.*

**सारांश :–**

*देशाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासात लोकसंख्या अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असते. लोकसंख्या ही त्या देशाची महत्वाची साधन संपदा असून मानवा जवळ क्षमता, दूरदृष्टी, कल्पकता श्रम करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे ते देशाचा विकास घडवून आणण्यासाठी उपयोग होत असतो. देशातील साधन संपदाचा वापर करून मानव स्वतःचा व देशाचा विकास घडवून आणत असतो.*

**संज्ञा :–** *राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक लोकसंख्या, बौध्दिकक्षमता, दुरदृष्टी, कल्पकता*

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

**प्रस्तावना :–**

देशातील साधन संपदापैकी लोकसंख्या ही फार मोठी साधनसंपदा आहे. मानव हा समुहाने राहतो मानवाजवळ एक सामाजिक दृष्टीकोन असतो आणि निकोप सामाजिक जीवनाच्या दृष्टीने लोकसंख्येमध्ये स्त्री–पुरूष प्रमाण समान असणे अत्यंत महत्वाचे असते.

**उद्दिष्टे :–**

1 औरंगाबाद जिल्हयातील स्त्री–पुरूष प्रमाण (Sex - Ratio ) अभ्यासणे.

2 तालूका निहाय स्त्री–पुरूष प्रमाण अभ्यासणे.

3 स्त्री–पुरूष प्रमाणातील बदल अभ्यासणे.

4 स्त्री–पुरूष प्रमाणातील बदलांचा चिकित्सक अभ्यास करणे.

**अभ्यास क्षेत्र :–**

औरंगाबाद जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी वसलेला जिल्हा आहे. सदरील जिल्हा हा मराठवाडयाची राजधानी म्हणूनही ओळखला जातो. औरंगाबाद जिल्हयामध्ये नऊ तालूके आहेत. त्यामध्ये सिल्लोड, सोयगांव, फुलंब्री, कन्नड, औरंगाबाद, गंगापुर, वैजापुर व पैठण इ. आहेत. औरंगाबाद जिल्हयांचा विस्तार $19^0$ 19′ व $20^0$ 40′ उत्तर ते $74^0$ 34′ व $76^0$ 04′ पूर्व रेखांश असा आहे. तालूका निहाय विस्तार पुढीलप्रमाणे.


ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– I Jan-Feb 2021

(1) खुलताबाद $20.05^0$N ते $75.18^0E$ (2) कन्नड $20.27^0$N ते $75.13^0E$ (3) पैठण $19^0 28' 48''$N ते $75^0 22' 48''$ (4) गंगापुर $19.6991^0$N ते $75.00860^0E$ (5) फुलंब्री $20^0 06'$N ते $75^0 25'E$ (6) सिल्लोड $20.3^0$N ते $75^0 25'E$ (7) सोयगांव $20.5943^0$N ते $75.617836^0E$ (8) वैजापुर $23.57^0$N ते $72.75^0E$ असे आहेत.



ISSN–2278-5655

AMIERJ

*Aarhat Multidisciplinary International Education Research Journal*

**Volume–X, Issues– I** **Jan-Feb 2021**




औरंगाबाद जिल्हा हा दख्खनच्या पठारावरील एक महत्वाचा जिल्हा आहे. जिल्हयात गोदावरीच्या उपनदया वाहतात. त्याच प्रमाणे अजिंठयांच्या डोंगर रांगा जिल्हयात पसरलेल्या आहेत. जिल्हयामध्ये म्हैसमाळ हे एक थंड हवेचे ठिकाण असुन वेरूळ लेणी व अजिंठा लेणी जगभर प्रसिध्द आहे.

**सं□ोधन पध्दती व माहीती संकलन** :– सदरील संशोधन हे द्वितीयक माहीतीवर आधारीत असुन वर्णात्मक व तुलनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. द्वितीयक माहीती ही जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, जणगणना अहवाल, सांखिकीय अहवाल यातुन घेण्यात आलेला आहे. सदर माहीती ही नकाशे, आकृत्या, स्तंभालेखा द्वारे प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

सदरील लेखा करीता औरंगाबाद जिल्हयांचा सन 1951 पासूनचा कालखंड विचारात घेतला गेला असून तालूक्या करीता सन 1991 पासून कालखंड घेतला आहे.

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– I Jan-Feb 2021


**औरंगाबाद जिल्हयातील लिंग गुणोत्तर :–**

**स्त्री–पुरूष प्रमाण**

| अ.क. | जिल्हा | जणगणना | लिंगगुणोत्तर | बदल |
|---|---|---|---|---|
| 1 | औरंगाबाद | 1951 | 974 | |
| 2 | | 1961 | 955 | -19 |
| 3 | | 1971 | 935 | -20 |
| 4 | | 1981 | 936 | +1 |
| 5 | | 1991 | 922 | -14 |
| 6 | | 2001 | 924 | +2 |
| 7 | | 2011 | 923 | -1 |

औरंगाबाद जिल्हयामध्ये सन 1951 पासुन सन 2011 पर्यंत स्त्री–पुरूष प्रमाण हे कमी-कमी होत आहे. सन 1951 च्या जणगणनेत स्त्रीयांचे प्रमाण दरहजारी पुरूषामागे 974 स्त्रीया हे प्रमाण होते. ते 1961 मध्ये 955 झालेले आढळते या दोन जणगणात हे प्रमाण 19 स्त्रीयाने कमी झालेले आढळते. त्याच प्रमाणे 1971 मध्ये 20 स्त्रीया 1991 मध्ये 14 स्त्रीया कमी झालेल्या आहेत.

सन 1991 च्या तुलनेत सन 2001 मध्ये स्त्रीयाचे प्रमाण दोन ने वाढले आहे व सन 2001 मध्ये ते प्रमाण एक ने कमी झालेले आहे.





**तहसिल नुसार लिंगगुणोत्तर** (Sex - Ratio) :–

| अ. क. | तालुका | जणगणना 1991 | जणगणना 2001 | फरक | जणगणना 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 932 | 928 | -4 | 920 | -8 |
| 2 | सोयगांव | 952 | 944 | -8 | 920 | -24 |
| 3 | सिल्लोड | 943 | 946 | 3 | 925 | -21 |
| 4 | फुलंब्री | | 951 | | 926 | -25 |
| 5 | औरंगाबाद | 891 | 903 | 12 | 918 | 15 |
| 6 | खुलताबाद | 924 | 928 | 4 | 933 | 5 |

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– I Jan-Feb 2021

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | वैजापुर | 944 | 944 | | 936 | -8 |
| 8 | गंगापुर | 938 | 925 | -13 | 920 | -5 |
| 9 | पैठण | 953 | 948 | -5 | 936 | -12 |
| **10** | **एकुण जिल्हा** | **922** | **924** | **2** | **923** | **-1** |




जिल्हयातील तालूकानुसार स्त्रीयांचे प्रमाण कमी-कमी होत आहे. हे कमी होण्याचे प्रमाण फुलंब्री तालूकयात सर्वात जास्त आहे. सदरील तालुक्यामध्ये सन 2001 च्या जणगणनेप्रमाणे दरहजारी पुरूषामागे 951 स्त्रीया होत्या ते सन 2011 च्या जणगणने प्रमाणे 926 स्त्रीया असे झाले. म्हणजेच या तालूक्यात दोन्ही जणगणना मध्ये 25 स्त्रीया कमी झालेल्या आढळतात. त्याच प्रमाणे सोयगाव, सिल्लोड, कन्नड, पैठण व वैजापुर तालूक्यामध्ये दरहजारी पुरूषामागे सन 2001 च्या जणगणनेच्या तूलनेत 2011 मध्ये हे प्रमाण अनूक्रमे 24,21,8,12,व ,8, ने कमी झालेले आहे.

मात्र औरंगाबाद तालूक्यात सन 1991 च्या जणगणनेप्रमाणे Sex-Ratio 891 होता. 2001 च्या जणगणनेमध्ये Sex-Ratio 903 झाला हया दोन्ही जणगणनेत सदरील तालूक्यात हा दर 12 ने वाढला आहे. तर जणगणना 2011 प्रमाणे Sex-Ratio 918 झाला 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये हयाच तालूक्यात Sex-Ratio 15 ने वाढलेला आहे.

खुलताबाद तालूक्यामध्ये Sex-Ratio प्रत्येक जणगणने मध्ये वाढत आहे. गंगापूर तालूक्यामध्ये Sex - Ratio कमी होताना दिसतो.

**निष्कार्श** :–

औरंगाबाद जिल्हयामध्ये सन 1951 पासुन सन 2011 पर्यंत दर हजारी पुरूषामागे स्त्रीयांचे प्रमाण कमी कमी होत आहे.

जिल्हयाचे दरहजारी पुरूषामागे स्त्रीया कमी होणाचे प्रमाण सरासरी 6.75 ऐवढे आहे.

औरंगाबाद तालूक्यामध्ये Sex-Ratio वाढत आहे.
फुलंब्री तालूक्यामध्ये Sex-Ratio कमी होण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे.
खुलताबाद तालूक्यामध्ये Sex-Ratio वाढत आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

औरंगाबाद जिल्हयाचा सामाजिक.आर्थिक अहवाल - 1991
औरंगाबाद जिल्हयाचा सामाजिक.आर्थिक अहवाल - 2001
औरंगाबाद जिल्हयाचा सामाजिक.आर्थिक अहवाल - 2011
लोकसंख्या भूगोल - डॉ. सुरेष फुले
लोकसंख्या भूगोल - के. ए. खतीव
लोकसंख्या भूगोल - डॉ. विठ्ठल घारपूरे